# साखळी सरकारी महाविद्यालयात १९ रोजी 'कथासंधी'

■ *टीम दैनिक हेराल्ड*



एन. शिवदास

**साखळी, दि. १६ :** साहित्य अकादमीतर्फे शुक्रवार दि. १९ रोजी साखळी येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात विद्यालयाच्या कोकणी आणि हिंदी विभागाच्या सहकार्याने सकाळी १० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात 'कथासंधी' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला कोंकणीचे ज्येष्ठ साहित्यिक तथा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते एन. शिवदास हे आपली कथा सादर करून कथेच्या निर्मिती प्रक्रियेविषयी उपस्थितांसोबत चर्चा करणार आहेत.

एन. शिवदास हे कोंकणीतील एक कथाकार आहेत. त्यांच्या अनेक कथा अन्य भारतीय भाषांमध्ये भाषांतरित झाल्या आहेत.

साहित्य अकादमीच्या अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन आत्यानी आपल्या कथा सादर केल्या आहेत. त्यांच्या 'भांगरसाळ' या पुस्तकासाठीचा २००५ सालचा त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करून त्यांच्या साहित्याचा गौरव केला आहे. कार्यक्रमाला एन शिवदास यांच्यासोबत साखळी सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जर्वासिओ मेंडीस, उपप्राचार्य डॉ.सोनिया सिरसाट,कार्यक्रमाचे संयोजक संयोजक आणि साहित्य अकादमीच्या कोंकणी विभाग सल्लागार समितीचे सदस्य झिलू गावकर उपस्थित राहणार आहेत.हा कार्यक्रम साहित्यिक,विद्यार्थी व साहित्यप्रेमींसाठी खुला असेल.सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.